RNI No. MAHBIL /2009/37831
Reg. No. MH/MR/South-339/2014-16

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ६, अंक ६१ (३)] गुरुवार, ऑगस्ट २१, २०१४/श्रावण ३०, शके १९३६ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक १७४**

## प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश**

**वित्त विभाग**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २१ ऑगस्ट २०१४

**अधिसूचना**

**महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२.**

क्रमांक-मुवक-१५१४/प्र.क्र.-५९/कराधान-१.— महाराष्ट्र मूल्यवर्धित कर अधिनियम, २००२ (२००५ चा महा. ९) यास जोडलेल्या अनूसूची ‘क’ मधील नोंद २ अ द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्र शासन, याद्वारे, खालील अनुसूचीमध्ये अधिक सविस्तर वर्णन केलेला खालील वस्तू उक्त नोंदीच्या प्रयोजनासाठी विमानाचे सुटे भाग म्हणून अधिसूचित करीत आहे, जसे :—

**अनुसूची**

केंद्रीय उत्पादन प्रशुल्क अधिनियम, १९८५ (१९८६ चा ५) मधील शीर्षाखाली किंवा उप शीर्षाखाली किंवा यथास्थिती उत्पादन शुल्क बाबींखाली वेळोवेळी समाविष्ट करण्यात आलेले विमानाचे सुटे भाग :—

| अ.क्र. (१) | शीर्ष क्रमांक (२) | उप शीर्ष क्रमांक (३) | टॅरीफ आयटम क्रमांक (४) | मालाचा तपशील (५) |
|---|---|---|---|---|
| १. | ८८०३ | – | – | उप शीर्ष ८८०२ ११, ८८०२ १२, ८८०२ २०, ८८०२ ३० आणि ८८०२ ४० खाली समाविष्ट असलेल्या विमानांचे सुटे भाग. |

**टीप.**– (१) केंद्रीय उत्पादन प्रशुल्क अधिनियम, १९८५ च्या तरतुदींचा अर्थ लावण्यासाठी असलेले नियम आणि सीमा शुल्क सहकार परिषद, ब्रुसेल्स यांनी प्रसिद्ध केलेल्या वेळोवेळी अद्ययावत करण्यात आलेल्या स्पष्टीकरणात्मक टिप्पण्या या अधिसूचनेच्या अर्थ उकलींसाठी लागू होतात.

(२) ज्या बाबतीत कोणत्याही वस्तू कोणत्याही शीर्षासमोर किंवा उप शीर्षासमोर किंवा यथास्थिती उत्पादन शुल्क बाबीखाली वर्णन करण्यात आलेल्या असतील आणि उपरोक्त वर्णन हे केंद्रीय उत्पादन प्रशुल्क अधिनियम, १९८५ मधील तत्संबंधित वर्णनापेक्षा कोणत्याही प्रकारे वेगळे असेल तर त्याबाबतीत उपरोक्त वर्णन केलेल्याच वस्तू केवळ या अधिसूचनेच्या कक्षेत येतील आणि इतर वस्तू जरी केंद्रीय उत्पादन प्रशुल्क अधिनियमातील तत्सम वर्णनाच्या कक्षेत येत असल्या तरी त्या या अधिसूचनेच्या कक्षेत येणार नाहीत.

(३) टीप (२) हीस अधीन राहून, या अधिसूचनेत समाविष्ट असलेल्या कोणत्याही नोंदीच्या प्रयोजनासाठी, ज्या बाबतीत कोणत्याही शीर्षाच्या किंवा उप शीर्षाच्या यथास्थिती, उत्पादन शुल्क बाबीच्या समोर असलेले वर्णन हे केंद्रीय उत्पादन प्रशुल्कातील तत्सम वर्णनाशी पूर्णपणे जुळते असेल तर त्या बाबतीत उक्त प्रशुल्काच्या प्रयोजनांसाठी त्या शीर्षाखाली किंवा उप शीर्षाखाली किंवा यथास्थिती, उत्पादन शुल्क बाबींखाली समाविष्ट करण्यात आलेल्या सर्व वस्तू या अधिसूचनेच्या कक्षेत येतील.

(४) ज्या बाबतीत कोणत्याही शीर्षासमोर किंवा उप शीर्षासमोर असलेले वर्णन " इतर " असे दर्शविण्यात आलेले असेल तर त्याबाबतीत टीप (२) मध्ये दिलेली अर्थ उकल लागू होईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**ओ. चै. भांगडिया,**
शासनाचे उप सचिव.

## FINANCE DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralya, Mumbai 400 032.
Dated the 21st August, 2014.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA VALUE ADDED TAX ACT, 2002.

No. VAT 1514/CR-59/ Taxation-1.—In exercise of the powers conferred by entry 2A of SCHEDULE A appended to the Maharashtra Value Added Tax Act, 2002 (Mah. IX of 2005), the Government of Maharashtra hereby notifies the following goods, more particularly described in the Schedule appended hereto, to be the spare parts of aircrafts, for the purposes of the said entry,. namely :–

*SCHEDULE*

Spare parts of aircrafts, covered from time to time under the heading or sub-heading or, as the case may be, tariff items of the Central Excise Traiff Act, 1985 (5 of 1986).

| Sr. No. | Heading No. | Sub-heading No. | Tariff Item No. | Description of the Commodity |
|---|---|---|---|---|
| (1) | (2) | (3) | (4) | (5) |
| 1. | 8803 | – | – | Parts of aircrafts, covered under sub-heading 8802 11, 8802 12, 8802 20, 8802 30 and 8802 40. |

*Note.*—(1) The Rules for the interpretation of the provisions of the Central Excise Tariff Act, 1985 read with the Explanatory Notes as updated from time to time published by the Customs Co-operation Council, Brussels apply for the interpretation of this notification.

(2) Where any commodities are described against any heading or sub-heading or, as the case may be, tariff items, and the aforesaid description is different in any manner from the corresponding description in the Central Excise Tariff Act, 1985, then only those commodities described as aforesaid will be covered by the scope of this notification and other commodities though covered by the corresponding description in the Central Excise Tariff will not be covered by the scope of this notification.

(3) Subject to Note (2), for the purpose of any entry contained in this notification, where the description against any heading or sub-heading, or as the case may be, tariff item, matches fully with the corresponding description in the Central Excise Tariff, then all the commodities covered for the purposes of the said tariff under that heading or sub-heading will be covered by the scope of this notification.

(4) Where the description against any heading or sub-heading is shown as " other ", then the interpretation as provided in Note (2) shall apply.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

O. C. BHANGDIYA,
Deputy Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.